महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-एमआयएस ०१२०/सीआर-३१/२०२१/मा.तं दिनांक:-२ ऑगस्ट २०२२

# -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या परीक्षांकरीता उत्तरपत्रिकेवर तपशील नमूद करण्याच्या वेळी उमेदवार व काहीवेळेस संबंधित समवेक्षक यांच्याकडून चुका होत असल्याचे निदर्शनास येते. तथापि, अशा चुकांमुळे उमेदवाराचे अवाजवी नुकसान होऊ नये, यादृष्टीने उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या तपशीलाची पडताळणी करुन उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्यात येते. यासंदर्भात आयोगाच्या कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत माहिती नसल्याने परीक्षेनंतर स्वत:ची चूक निदर्शनास आल्यावर उमेदवारांकडून आयोगाकडे ई-मेल, पत्र व दूरध्वनीद्वारे सतत पाठपुरावा केला जातो.

**२.** उमेदवार/समवेक्षक यांच्याकडून उत्तरपत्रिकेवरील तपशील नमूद करण्यात होणाऱ्या चुकांच्या अनुषंगाने उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनासंदर्भात आयोगाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते:-

| अ.क्र. | चुकांचा तपशील | मुल्यांकनासंदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| १ | परीक्षेचे नाव नमूद न करणे. | उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन केले जाते. |
| २ | बैठक क्रमांक चुकीचा लिहिणे व/अथवा संबंधित वर्तुळ चुकीचे छायांकित करणे अथवा दोन्ही नमूद न करणे. | |
| ३ | स्वाक्षरी करावयाचे राहून जाणे. | |
| ४ | सोडवलेल्या प्रश्नांची संख्या चुकीची लिहिणे. | |
| ५ | समवेक्षकाने स्वाक्षरी न करणे. | |

**३.** उपरोक्त चुकांव्यतिरिक्त उमेदवार व समवेक्षक यांच्याकडून प्रश्नपुस्तिकेचे संच (Question Booklet Series) अचूक/सुसंगत नमूद न केल्यास आयोगाच्या कार्यालयाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते:-

| अ.क्र. | उमेदवार/समवेक्षक यांची कृती | मुल्यांकनासंदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| १ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले आहे (उदा. A) आणि एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित केली आहेत. (उदा. A व B) | उमेदवाराने लिहिलेले संच अक्षर व छायांकित केलेले संच अक्षर यामधील सामायिक संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| २ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले आहे. (उदा. A) परंतु, संबंधित वर्तुळ छायांकित केलेले नाही. | उमेदवाराने लिहिलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ३ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही. परंतु, संबंधित वर्तुळ छायांकित केले आहे. (उदा. A) | उमेदवाराने छायांकित केलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ४ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही. परंतु, एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित केली आहेत (उदा. A व B) आणि समवेक्षकाने लिहिलेले (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. A) एकच आहे. | उमेदवाराने छायांकित केलेल्या व समवेक्षकाने लिहिलेल्या व छायांकित केलेल्या संच अक्षरांपैकी सामायिक संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ५ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही. परंतु, एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित केली आहेत. (उदा. A व B) आणि समवेक्षकाने लिहिलेले (उदा. A) व छायांकित केलेले संच (उदा. B) अक्षर भिन्न आहेत. | उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जात नाही. |
| ६ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही व वर्तुळ छायांकित केलेले नाही. परंतु, समवेक्षकाने एकच संच अक्षर लिहून (उदा. A) संबंधित वर्तुळ छायांकित केले आहे. (उदा. A) | समवेक्षकाने लिहिलेल्या/छायांकित केलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |

| | | |
|---|---|---|
| ७ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही व वर्तुळ छायांकित केलेले नाही. तसेच, समवेक्षकाने संच अक्षर लिहिले आहे (उदा. A) तथापि संबंधित वर्तुळ छायांकित केले नाही. | समवेक्षकाने लिहिलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ८ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही व वर्तुळ छायांकित केलेले नाही. तसेच, समवेक्षकाने संच अक्षर लिहिले नाही. तथापि संबंधित वर्तुळ छायांकित केले आहे. (उदा. A) | समवेक्षकाने छायांकित केलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ९ | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही व वर्तुळ छायांकित केलेले नाही. तसेच, समवेक्षकाने लिहिलेले संच अक्षर (उदा. A) व छायांकित केलेले वर्तुळ भिन्न आहेत. (उदा. B) | उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जात नाही. |
| १० | उमेदवाराने संच अक्षर लिहिले नाही व वर्तुळ छायांकित केलेले नाही. तसेच, समवेक्षकाने संच अक्षर लिहिले आहे (उदा. A) परंतु एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित केली आहेत. (उदा. A व B) | समवेक्षकाने नमूद केलेल्या संच अक्षरांपैकी सामायिक संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| ११ | उमेदवाराने लिहिलेले संच अक्षर (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. B) भिन्न आहे. परंतु, समवेक्षकाने लिहिलेले (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. A) एकच आहे. | समवेक्षकाने लिहिलेल्या व छायांकित केलेल्या संच अक्षराच्या आधारे (A) उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाते. |
| १२ | उमेदवाराने लिहिलेले संच अक्षर (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. B) भिन्न आहे. तसेच समवेक्षकाने लिहिलेले (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. B) ही भिन्न आहेत. | उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जात नाही. |
| १३ | उमेदवाराने लिहिलेले संच अक्षर (उदा. A) व छायांकित केलेले संच अक्षर (उदा. B) भिन्न आहे. तसेच समवेक्षकाने संच अक्षर लिहिले अथवा छायांकित केले नाही. | उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जात नाही. |
| १४ | उमेदवार व समवेक्षक दोघांनीही संच अक्षर लिहिले नाही व छायांकित केले नाही. | उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जात नाही. |

**४.** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन संगणकीय प्रणालीद्वारे केले जात असल्यामुळे त्यामध्ये मानवी हस्तक्षेपाला वाव नाही. त्यामुळे उत्तरपत्रिकेवरील चुका/त्रुटींच्या अनुषंगाने परीक्षेनंतर उमेदवारांकडून केला जाणारा कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जात नाही व अशा प्रकारचा पत्रव्यवहार परस्पर दफ्तरीदाखल करण्यात येतो.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग